Newspaper : Maharashtra Times

Article date : 25th July 2018

Pre article Mathematrix 2018

# गणित सोपं झालं हो



## पोदारमध्ये 'मॅथेमॅट्रीक्स'


मुंबई टाइम्स टीम

muntainbox@gmail.com


तुला कोणता विषय आवडत नाही? कदाचित या प्रश्नाचं उत्तर बरेच जण एकच देतील ते म्हणजे गणित. विद्यार्थ्यांच्या आयुष्यातला 'डर का दुसरा नाम' म्हणजे गणित. गणितातली गंमतजंमत मुलांना दाखवण्यासाठी आणि त्यांच्या मनातली गणिताची भीती काढून टाकण्यासाठी पोदार कॉलेजमध्ये 'मॅथेमॅट्रीक्स' हा फेस्टिव्हल भरवण्यात येणार आहे. येत्या २७ आणि २८ जुलै या दोन दिवशी होणाऱ्या या फेस्टमध्ये गणितावर आधारित वेगवेगळे इव्हेंट्स, सेमिनार, प्रदर्शन भरवण्यात येणार आहे. प्रदर्शन शाळेच्या आणि कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी २ दिवस खुलं आहे. 'महाराष्ट्र टाइम्स' या फेस्टिव्हलचा मीडिया पार्टनर आहे. संपर्क - ८०८२३६८३०४, ९८९२८७४९११.

### काही खास इव्हेंट्स

**न्यूमेरो आर्ट:** गणितीय चिन्ह आणि संज्ञा वापरून चित्र स्पर्धा (फक्त शालेय विद्यार्थ्यांसाठी)

**फोर डी आणि मूव्ह विथ मॅथ्स** यासारख्या प्रश्न मंजुषा आणि हसत खेळत गणित शिकवण्यासाठी 'थी मॅथेमॅजिशिअन' शो.

**बॅटल ऑफ बिड्स:** आयपीएलप्रमाणे खेळाडूंवर बोली लावण्याची व त्यांना विकत घेण्यासाठी संधी देणारा एक इव्हेंट.

### कळवा तुमचे फेस्टिव्हल

तुमच्या कॉलेजचा फेस्टिव्हलची धमाल, त्यातले रंगतदार इव्हेंट्स सर्वांपर्यंत पोहोचवायचे आहेत? तुमचा दोस्त 'मुंटा' तुमच्यासोबत आहे. कॉलेज फेस्टिव्हलची थोडक्यात माहिती, कोऑर्डिनेटरच्या नंबरसह इमेल करा. muntainbox@gmail.com